**नियमित फौजदारी केस नं. ५६/२०१५**

**निशाणी क्रमांक – १५४**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०९ चा जबाब शपथेवर सुरु</u>.**

**माझे नाव –** अभिषेक सुधीर विचारे,

**वय –** ३१ वर्ष, **धंदा–** बांधकाम ठेकेदार,

**राहणार —** नावडी, संगमेश्वर, ता. संगमेश्वर, जि.रत्नागिरी.

**<u>अभियोगपक्षातर्फे सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर</u>**

**<u>यांचेकडून सुरु</u> –**

**०१.** दिनांक १०/०३/२०१४ रोजी मी माझ्या गावी हजर होतो. त्यादिवशी संगमेश्वर, नावडी बाजारपेठेमध्ये विजय श्री सॉ मिल येथे मी जात असताना पोलीस मला भेटले होते. पोलीसांनी मला साक्षीदार म्हणून सही करण्यास सांगितले. पोलीसांनी प्रणय प्रकाश सुर्वे यांच्या घरी झडती घेतली होती. त्यामुळे त्यांनी मला कागदावर सही करण्यास सांगितले. त्यावेळी आणखीन एक इसम हजर होता, त्याचे नाव मला माहिती नाही. पोलीस तेथे हजर होते. प्रणय सुर्वे यांचे घर पोस्ट गल्लीमध्ये महामार्गाला लागून आहे. पोलीसांना सुर्वे यांच्या घरात काहीही मिळाले नाही.

**०२.** पोलीसांची सुर्वे यांच्या घरातील झडती झाल्यानंतर ते बाहेर आले होते व नंतर त्यांनी माझी सही घेतली होती.

**(साक्षीदार पूर्वीच्या जबानीशी विसंगत साक्ष देत असल्याने विशेष सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलटतपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली, परवानगी मंजूर.)**

**०३.** हे मला माहिती नाही की, दिनांक १०/०३/२०१४ रोजी प्रविण सुर्वे यांच्या पोस्ट गल्लीतील घरातुन झडती घ्यायची असल्याने रमेश मोटे हा एक पंच त्यावेळी हजर होता. हे म्हणणे खरे नाही की, मी, दुसरा पंच व पोलीस असे मुंबई

गोवा हायवे रोडवर पोस्ट गल्लीमध्ये जाणाऱ्या रस्त्यालगत विजय श्री सॉ मिलच्या बाजुला उभे असलेल्या इसमास प्रणय प्रकाश सुर्वे यांचे घर विचारले असता, त्याने हाताच्या इशाराने दाखविलेल्या घराकडे आम्ही गेलो. हे म्हणणे खरे नाही की, सदर दरवाजा वाजविला असता आतमधुन एक इसम बाहेर येवुन त्याने त्याचे नाव प्रकाश दत्ताराम सुर्वे असे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, त्याला पोलीसांनी घर झडतीचा उद्देश कळवुन घर झडती घेण्याची संमती त्यांनी दिल्यानंतर पोलीस व पंच यांची त्यांना झडती घ्यायची आहे का असे विचारले असता त्यांनी नकार दिला. हे म्हणणे खरे नाही की, त्यांच्या घराचा नावडी, ग्रामपंचायत घर क्रमांक २०३–ब असा असल्याचे सांगितले.

०४. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे घर उतराभिमुख सिमेंट कॉक्रीटचे असुन घरात प्रवेश करण्यासाठी ०२ फूट रुंदीची व २० फूट लांबीची गॅलरी आहे. हे म्हणणे खरे आहे की, घरात प्रवेश केल्यावर पश्चिम बाजुस प्रकाश सुर्वे यांची झोपण्याची १० X १५ फूट लांबीची खोली, त्या पुढे ०६ x ०६ फूट लांबीचे स्वयंपाक घर, दक्षिण भिंतीलगत ०२ बेडरुम असुन किचन लगत अंजली सुर्वे यांची बेडरुम व त्यालगत प्रणय प्रकाश सुर्वे यांची बेडरुम आहे.

०५. हे म्हणणे खरे नाही की, प्रणव सुर्वे यांच्या बेडरुमधुन भिंतीलगत डाव्या बाजुच्या कपाटातुन सफेद रंगाच्या प्लॅस्टीक पिशवीमध्ये एक काळया रंगाची सर्च लाईट व वायर मिळुन आली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदरची सर्च लाईट पोलीसांनी माझ्यासमक्ष जप्त केली व तसा पंचनामा त्यांनी माझ्यासमक्ष तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा तयार झाल्यावर तो वाचुन पाहुन त्यावर व सहयांच्या कागदी लेबलवर मी सही केली.

०६. पोलीसांनी मला त्यावेळी कोणतीही वस्तु दाखविली नव्हती. माझी तेव्हा पोलीसांनी दोन कागदांवर सही घेतली होती.

**०७**. *(साक्षीदारास दिनांक १०/०३/२०१४ रोजीचा घर झडती पंचनामा दाखविला)*. त्यावर अनुक्रमांक ०२ वर माझी सही आहे. त्यातील मजकूर मी वाचून पाहिला नव्हता. *(**सही पुरत्या भागास निशाणी १५५** देणेत आली)*.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास – आरोपी क्र. ०१, ०२ व ०४ तर्फे विद्वान विधीज्ञ श्री. आर. के. शिंदे व**

**आरोपी क्र. ०३ तर्फे विधीज्ञ श्री. सी. एम. मांगले यांनी उलटतपास नाकारला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.08.25 16:02:50 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दिनांक –२५.०८.२०२५

न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख

**CERTIFICATE**

Evidence in RCC No. 56-2015

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S. A. Bhale |
| Court name | : | Civil Judge, J. D. and J.M.F.C., Deorukh. |
| Date | : | 25/08/2025 |
| Evidence signed by the presiding officer on | : | 25/08/2025 |
| Evidence uploaded on | : | 25/08/2025 |